# नगर परिषद भरती

समाविष्ठ विषय

• मराठी • इंग्रजी • सामान्य ज्ञान • बौद्धिक चाचणी

पॅटर्न

**TCS व IBPS**

अभ्यासक्रमावर आधारित




# संपूर्ण मार्गदर्शक

नगर परिषद परीक्षेच्या जुन्या प्रश्नांचा समावेश

कुठल्या पदांसाठी उपयुक्त

- CIVIL ENGINEER
- ELECTRICAL ENGINEER
- MECHANICAL ENGINEER
- COMPUTER ENGINEER
- ENVIRONMENT ENGINEER
- स्वच्छता अभियांत्रिकी सेवा पाणीपुरवठा
- जल निसरण व स्वच्छता अभियांत्रिकी (गट क)
- लेखापरीक्षण, लेखासेवा,लेखापाल व लेखापरीक्षक (गट क)
- कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी (गट क)
- अग्निशामक अधिकारी (गट क)
- स्वच्छता निरीक्षक (गट क)

BEST SELLER

१०००+ अतिसंभाव्य प्रश्नांसह

infinity®

# नगर परिषद भरती
# संपूर्ण मार्गदर्शक

समाविष्ठ विषय


• मराठी • इंग्रजी • सामान्य ज्ञान • बौद्धिक चाचणी

- सर्व नॉन टेक्निकल विषयांचा समावेश
- नगर परिषदच्या सर्व पदांसाठी उपयुक्त
- सर्व विषयांचे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न
- १००० पेक्षा जास्त प्रश्नाचा समावेश
- उत्तम आकलनासाठी साध्या व सोप्या भाषेत मांडणी
- जलद उजळणी साठी उपयुक्त

पुस्तक मागणीसाठी संपर्कः

**8263954946**

infinity® Engineering Academy



# श्री स्वामी समर्थ...

स्वामींच्या चरणी अर्पण ...

# लेखकाचे मनोगत

नमस्कार,

स्पर्धा परिक्षाची तयारी करणाऱ्या सिव्हील इंजिनिअरींगच्या परिक्षार्थ्यांना "नगर परिषद भरती २०२३ संपूर्ण मार्गदर्शक" हे पुस्तक सादर करताना अत्यंत आनंद होत आहे.

नगर परिषद परीक्षेची तयारी करताना एकाच पुस्तकात सर्व विषयांचा अभ्यास करता यावा, या उद्देशाने या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. अशा प्रकारचं हे एकमेव पुस्तक आहे.

1000 हुन अधिक PYQ आणि अतिसंभाव्य प्रश्न या पुस्तकात आहे. ज्यामध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान आणि बौद्धिक चाचणी असे सर्व नॉन टेक्निकल चे ४ महत्वाचे विषय यात हाताळले आहेत. सामान्य ज्ञान अंतर्गत इतिहास, महाराष्ट्राचा व भारताचा भूगोल ,भारतीय राज्यव्यवस्था ,भारतीय अर्थव्यवस्था ,पर्यावरण ,अशा विषयांचा समावेश यात समावेश आहे.

नगर परिषद भरती मधील खालील पदांसाठी हा अभ्यासक्रम खूप उपयुक्त आहे : CIVIL/ELECTRICAL/MECHANICAL/COMPUTER/ENVIRONMENT ENGINEER, स्वच्छता अभियांत्रिकी सेवा पाणीपुरवठा जल निसरण व स्वच्छता अभियांत्रिकी ( गट क) , लेखापरीक्षण, लेखासेवा,लेखापाल व लेखापरीक्षक (गट क),कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी (गट क), अग्निशामक अधिकारी (गट क), स्वच्छता निरीक्षक (गट क). नगर परिषदच्या मागील परीक्षेतील प्रश्नांचा उत्तरासहित यात समावेश आहे. उत्कृष्ठ व आकर्षक मांडणी ,विषयवार आणि मुद्देसूद मांडणी हे या पुस्तकांचे वैशिष्ट्य आहे.

त्यामुळे हे पुस्तक तुम्हाला परिपूर्ण तयारीसाठी निश्चित उपयुक्त ठरेल.

अशाप्रकारे या पुस्तकाचा अभ्यास तुम्हाला तुमच्या स्पर्धा परिक्षेच्या प्रवासासाठी मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही. हे पुस्तक सर्व परिक्षार्थ्यांसाठी अनिवार्य आहे.

'इन्फिनिटी ॲकॅडमी'च्या सर्व टीमचा मी आभारी आहे, ज्यांनी सखोल अभ्यास आणि संशोधन करून कमी वेळात हे पुस्तक आपल्यासमोर सादर केले आहे. त्यांच्याशिवाय हे अशक्य होते.

आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा घेण्यासाठी सज्ज व्हा. तुमच्या या प्रवासात आम्ही तुमच्यासोबत आहोत. स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या सर्व परिक्षार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा...!

सदर पुस्तकात चुका आढळल्यास 7057492418 या क्रमांकावर वॉट्स ॲप मेसेज करा.


आपला

गिरीश खेडकर

9158999422


infinity® Engineering Academy

# INDEX

## NON-TECHNICAL SUBJECTS

**मराठी** **1**

1. मराठी बाराखडी व व्याकरण 2
2. संधी 4
3. शब्दांच्या जाती 5
4. काळ व त्याचे प्रकार 22
5. प्रयोग 24
6. अलंकार 26
7. वाक्यांचे प्रकार 28
8. समास 31
9. समानार्थी शब्द 35
10. विरुद्धार्थी शब्द 38
11. वाक्प्रचार 41
12. म्हणी 45
13. विरामचिन्हे 49
14. शब्दसमूह 50
15. उतारे व त्यावरील प्रश्न 52

PREVIOUS YEAR QUESTIONS 69

QUESTIONS FOR PRACTICE 71

**ENGLISH** **73**
1. PARTS OF SPEECH 74
2. CHANGE THE VOICE 80
3. ARTICLES 87
4. TENSE 88
5. VERBS: MODALS 95
6. DIRECT AND INDIRECT SPEECH 98
7. IDIOMS AND PHRASES 102
8. VOCABULARY 109
9. PASSAGE 122
PREVIOUS YEAR QUESTIONS 131
QUESTIONS FOR PRACTICE 134

**सामान्य ज्ञान** **160**
इतिहास 161
महाराष्ट्रातील समाज सुधारक 191
भारताचा भूगोल 205
महाराष्ट्राचा भूगोल 226
भारतीय राज्यव्यवस्था 264
भारतीय अर्थव्यवस्था 319
पर्यावरण 346
PREVIOUS YEAR QUESTIONS 391
QUESTIONS FOR PRACTICE 395

**अंकगणित** **411**

**बौद्धिक चाचणी** **432**

# मराठी

infinity® Engineering Academy

# 1. मराठी बाराखडी व व्याकरण

## मराठी मुळाक्षरे / वर्णमाला

अ आ इ ई उ ऊ ऋ लृ ए अॅ ऐ ओ ऑ औ अं अः

क ख ग घ ङ	च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण	त थ द ध न

प फ ब भ म	य र ल व श ष स ह ळ क्ष ज्ञ

### वर्णमालेविषयी महत्वाचे

1) मूळ वर्णमालेतील वर्णांची संख्या 48 होती तर आधुनिक वर्णमालेत ती 52 आहे.

2) ऋ, लृ या स्वरांचा चौदाखडीत समावेश होत नाही.

3) 'अँ, आँ' यांचा पाठ्यपुस्तकात स्वर असा उल्लेख आहे; म्हणून उत्तरसुद्धा स्वर असेच द्यावे.

4) 'र' या वर्णाचा उच्चार करताना कंपन होते; म्हणून त्याला 'कंपित वर्ण' म्हणतात.

5) शब्दाच्या शेवटी येणाऱ्या व्यंजनाचा पाय मोडलेला असेल तर त्याला व्यंजनान्त म्हणतात, जर पाय मोडलेला नसेल तर त्याला स्वरांन्त म्हणतात.

6) शेवटी स्वतंत्र उभा दंड असलेले वर्ण - श्, ण, ग् -

7) मध्ये उभा दंड - क्, फं ----..

8) उभ्या दंडाला जोडलेले - न्, त् ----

9) अर्धा उभा दंड - ट्, ड् ----

10) कोणताही दंड नसलेले वर्ण - र्

### वर्णांचे वर्गीकरण

**1) स्वर:**

- ओठांचा एकमेकांशी किंवा जिभेचा मुखातील कोणत्याही भागाशी स्पर्श न होता तोंडावाटे जे ध्वनी बाहेर पडतात, त्यांना स्वर असे म्हणतात.
- स्वर स्वतंत्र उच्चाराचे असतात.
- स्वरांचे खालीलप्रमाणे प्रकार पडतात :

**अ) ऱ्हस्व स्वर :-**

- अ, इ, उ, ऋ, लृ ' या स्वरांचा उच्चार आखूड होतो, म्हणजे उच्चार करावयास कमी कालावधी लागतो; म्हणून त्यांना ऱ्हस्व स्वर म्हणतात.
- ' ऋ ' हा स्वर व्यंजनात मिसळल्यास त्या व्यंजनात दर्शविल्याप्रमाणे बदल होतो. क + ऋ= कृ

**ब) दीर्घ स्वर :-**

- 'आ, ई, ऊ' या स्वरांचा उच्चार करण्यासाठी जास्त कालावधी लागतो म्हणजेच लांबट उच्चार होतो; म्हणून त्यांना दीर्घ स्वर म्हणतात.

**क) संयुक्त स्वर :-**

- 'ए, ऐ, ओ, औ' हे स्वर इतर दोन स्वरांचे मिळून बनल्याने त्यांना संयुक्त स्वर म्हणतात. संयुक्त स्वर दीर्घ उच्चाराचे असतात.
- उदा : 1) ए = अ + इ/ ई
- 2) ऐ = आ + इ / ई
- याशिवाय स्वरांचे सजातीय स्वर व विजातीय स्वर असे उच्चार स्थानांवरुन दोन प्रकार पडतात.

**1) सजातीय स्वर**

- तोच स्वर ऱ्हस्व किंवा दीर्घ पुन्हा आल्यास सजातीय स्वरांची जोडी तयार होते. संयुक्त स्वरांचा सजातीय स्वरांमध्ये समावेश होत नाही. एकाच उच्चार स्थानांतून निघणाऱ्या स्वरांना सजातीय स्वर असे म्हणतात.
- उदा : 1) अ – आ 2) इ–ई 3) उ-ऊ
- टीप : पूर्वी ऋ–ॠ, ल- लृ यांचासुद्धा सजातीय स्वरामध्ये समावेश केला जात होता; परंतु आता यातील दीर्घ स्वर जवळजवळ वापरात नाहीत.

**2) विजातीय स्वर**

- तोच स्वर ऱ्हस्व किंवा दीर्घ पुन्हा न येता दुसराच स्वर आल्यास विजातीय स्वरांची जोडी तयार होते. भिन्न उच्चार स्थानांतून निघणाऱ्या स्वरांना 'विजातीय स्वर' असे म्हणतात. ए, ऐ, ओ, औ या संयुक्त स्वरात सजातीयत्व नाही कारण ते मुळातच विजातीय स्वरोत्पन्न आहेत.
- उदा: 1) अ-इ 2) अ – उ 3) उ- 4) इ-ऊ

<u>सजातीय व विजातीय स्वरांविषयी महत्त्वाचे :</u>

1) दोन सजातीय स्वरांपासून एकच दीर्घ स्वर तयार होतो.

2) दोन विजातीय स्वर एकत्र आल्यास संयुक्त स्वर तयार होतो.

3) दोन संयुक्त स्वर एकमेकांत मिसळत नाहीत.

**2) स्वरादी:**

- अं व अः' अनुस्वार व विसर्ग या दोन वर्णांचा उच्चार करण्यापूर्वी एखाद्या स्वराचा उच्चार करावाच लागतो, म्हणून ज्याच्या आधी स्वर आहे त्याला स्वरादी असे म्हणतात.

**3) व्यंजने :**

1) वर्णमालेत एकूण 36 व्यंजने आहेत.

2) उच्चार करताना जिभेचा तोंडातील इतर अवयवांना स्पर्श तसेच हवेचा मार्ग अडवून शेवटी स्वरांचे साहाय्य घ्यावे लागणाऱ्या प्रत्येक वर्णाचा व्यंजनात समावेश होतो.

3) व्यंजनांचा उच्चार पूर्ण/स्पष्ट करण्यासाठी शेवटी स्वराचे साहाय्य घ्यावे लागते; म्हणून त्यांना' "स्वरान्त" 'असेसुद्धा म्हणतात.

4) व्यंजने ही अपूर्ण उच्चारांची असल्याने त्यांचा पाय मोडून लिहितात, त्यात स्वर मिळवल्यास मात्र ती पाय मोडून लिहिली जात नाहीत.

5) उच्चार पूर्ण होण्यासाठी व्यंजने स्वरांवर अवलंबून असतात; म्हणून त्यांना 'परवर्ण' म्हणतात.

6) व्यंजनांना अक्षरत्व येण्यासाठी व्यंजनात स्वर मिसळणे गरजेचे असते.

7) आखूड / तोकड्या उच्चाराला निभृत उच्चार म्हणतात.

8) व्यंजनात स्वर मिळवला,की अक्षर बनते.

**व्यंजनांचे प्रकार**

**i) स्पर्श व्यंजने :-** **ii) अर्धस्वर .**

**iii) उष्मे:-** **iv)महाप्राण:**

**v) द्रविडीयन वर्ण :**

**vi) संयुक्त व्यंजने :-** "क्ष, ज्ञ" या संयुक्त व्यंजनांचाही

**4) अनुनासिक/परस-वर्ण :-**

- ङ् , ञ्, ण, न् , म् , या वर्णांचा उच्चार तोंडाबरोबर थोडा नाकातूनही होतो; म्हणून त्यांना अनुनासिके म्हणतात.
- अनुनासिके अनुस्वाराच्या ऐवजी वापरता येतात; म्हणून त्यांना पर-सवर्ण म्हणतात.

| कठोर | मृदू | अनुनासिक |
|---|---|---|
| **क् ,ख्** | ग् , घ् | ङ |
| **च् , छ्** | ज् , झ् | ञ |
| **ट , ठ** | ड ,ढ | ण |
| **त , थ** | द , ध | न |
| **प् , फ्** | ब् भ् | म् |

**वर्ण व त्यांची उच्चारस्थाने-**

| स्वर | व्यंजन /स्वरादी | मुखाचा भाग | वर्णांचे नाव |
|---|---|---|---|
| **अ ,आ** | क् ,ख् ,ग् ,घ् ,ङ ,ह् , अः | कंठ | कंठ्य (पडजिभेजवळील जागा ) |
| **इ , ई** | च् ,छ् ,ज् ,झ् ,ञ ,य् श | तालु | तालव्य (जेथे चिंच चघळतो ती जागा ) |
| **ऋ** | ट ,ठ ,ड ,ढ ,ण ,र ,ष ळ | मुर्धा | मूर्धन्य (कंठ व टाळू यांच्यामधील जागा) |
| **ल** | त ,थ ,द ,ध ,न ,ल ,स् | दंत | दंत्य (दात ) |
| **उ ,ऊ** | प् ,फ् ,ब् ,भ् म | ओठ्य | ओठ्य (ओठ ) |
| **ए ,ऐ** | | कंठ +तालु | कंठतालव्य(कंठ आणि टाळू ) |
| **ओ ,औ** | | कंठ + ओठ्य | कंठौओठ्य (कंठ आणि ओठ ) |

## शब्द

- दोन किंवा अधिक अक्षरांना एकत्र आणल्यानंतर त्यांचे एकत्र वाचन अथवा उच्चार केल्यास त्यांच्यापासून कशाचा तरी अर्थबोध होतो. अशा अक्षरांच्या समूहाला शब्द म्हणतात.
- उदा: ब + घ = बघ

## वाक्य

- दोन किंवा दोनपेक्षा आधिक शब्द जवळ आणल्यानंतर वाक्य तयार होते.
- काना ा
- वेलांटी ि ी ऱ्हस्व, दीर्घ

# आधुनिक भारताचा इतिहास

infinity®
Engineering Academy

# **1.** महत्वाची युद्धे व संस्था

## प्लासीची लढाई (23 जून, 1757)

- गुप्त करारात ठरल्याप्रमाणे सिराजउद्दौलावर क्लाईव्हने आरोप केला की, त्याने फ्रेंचांशी संधान बांधून इंग्रजांना फसविले. क्लाईव्हने सिराजउद्दौलाकडे काही अशक्यप्राय मागण्याही केल्या. त्या मागण्या सिराजउद्दौलाने फेटाळल्यानंतर, क्लाईव्ह आपल्या 8 हजार फौजेसह सिराजउद्दौलाचा तळ असलेल्या मुर्शिदाबादकडे निघाला.
- सिराजउद्दौला आपल्या 50 हजार फौजेनिशी मुर्शिदाबादेत तयार होता. दोन्ही फौजा प्लौसी येथे समोरासमोर आल्या व 23 जून, 1757 रोजी एकमेकांना भिडल्या. नबाबाच्या फौजेचे नेतृत्व मीरजाफर व रायवल्लभ करीत होते.
- गुप्त करारातील अटीनुसार दोन्ही सेनापतींनी युद्धात काहीच हालचाल केली नाही. सिराजउद्दौलाला मदत करणारी फ्रेंच फौज मात्र शौयाने लढली.
- नबाबाची फौज युद्धात भागच घेत नसल्यामुळे सिराजउद्दौलाचा पराभव अटळ होता. या प्लासीच्या लढाईत सिराजउद्दौलाचा दारूण पराभव झाला, त्याचे 5 हजार सैनिक मारले गेले, कंपनीचे मात्र फक्त 29 मारले गेले.
- नबाब पळून जाण्यात यशस्वी झाला, परंतु त्याला राजमहाल येथे पकडले व मीरजाफरच्या हुकमावरून त्याचा पुत्र मिरान याने त्यास ठार मारले. त्यानंतर चार दिवसांनी मुर्शिदाबाद येथे बंगालचा नवाब म्हणून मीरजाफरची घोषणा झाली.

## बक्सारची लढाई (23 ऑक्टोबर, 1764)

- प्लासीच्या लढाईनंतर गुप्त करारात मान्य केल्याप्रमाणे मीरजाफर यास बंगालच्या नबाबपदावर बसविण्यात आले. परंतु मीरजाफर भलताच कमकुवत राज्यकर्ता ठरला. इंग्रजांच्या लोभी व स्वार्थी कृत्यामुळे बंगाली लोकांची परिस्थितीही दयनीय झाली, क्लाईव्ह असेपर्यंत मीरजाफर नबाबपदावर कसा तरी टिकून राहिला, परंतु तो मायदेशी गेल्यानंतर बंगालमधील राजकीय परिस्थितीने असे वळण घेतले की मीरजाफरला नबाबपदावरून निवृत्त व्हावे लागले व त्याचा जावई मीरकासीम यास इंग्रजांनी नबाबपदावर बसवले. त्या मोबदल्यात मीरकासीमशी तह करून बरद्वान, मिदनापूर आणि चित्तगांव हे जिल्हे, मीरजाफरच्या काळातील खंडणीची बाकी, कर्नाटक युद्धातील खर्च इत्यादी गोष्टी इंग्रजांनी मीरकासीमकडून मिळवल्या. याशिवाय इंग्रज अधिकाऱ्यांना मोठ्या रकमा देण्याचेही मीरकासीमने तोंडी कबूल केले.

## तैनाती फौजेचे करार

### 1. हैद्राबादच्या निजामाशी करार (1798)

हैद्राबादच्या निजामाने आपल्या प्रदेशात ब्रिटिश फौज ठेवण्यासंबंधीचा करार केला, ब्रिटिशांनी आपल्या 6 बटालियन हैद्राबादेत ठेवून फ्रेंचांना हाकलून दिले. या फौजेचा खर्च म्हणून ब्रिटिशांनी 2 लाख 41 हजार 710 पौंड निजामाकडून वसूल केले. फौजेचा वाढता खर्च झेपेनासा झाल्याने निजामाने आपल्या संस्थानाचा काही भागच ब्रिटिशांच्या हवाली केला.

### 2. अवधच्या नबाबाशी करार (1801)

इंग्रजांनी अवध संस्थानांत मोठी फौज तैनात केली, नबाबाने - आपली फौजच बरखास्त करून टाकली. इंग्रज फौजेच्या खर्चासाठी म्हणून नबाबाने अर्धे राज्यच इंग्रजांना देऊन टाकले. अवधचा अंतर्गत कारभारही इंग्रज रेसिडेंटच्या सल्ल्याने होऊ लागला आणि नबाब ब्रिटिश कंपनीचा मांडलिक बनला.

## संस्थाने खालसा करण्याचे धोरण (Doctrine of Lapse)

हिंदुस्थानात 'ब्रिटिश साम्राज्याची उभारणी' (Builder of the British Empire) करणारा म्हणून ओळखला जाणारा लॉर्ड डलहौसी (1848-56) गव्हर्नर जनरल म्हणून हिंदुस्थानात येताच, त्याने आपल्या आक्रमक धोरणाची चुणूक दाखविण्यास प्रारंभ केला. आपल्या आठ वर्षांच्या कारकिर्दीत त्याने हिंदुस्थानातील ब्रिटिशांचे प्रशासन सुधारले. जिंकलेल्या प्रदेशात स्थैर्य निर्माण केले, शिवाय आपल्या प्रशासनासाठी सातत्याने पैसा मिळत राहील

याची व्यवस्था करण्यासाठी कायमस्वरूपी पैशाचे स्रोत तयार केले. हिंदुस्थानातील संस्थाने जिंकून ब्रिटिश राज्यात त्यांना समाविष्ट करणे, या कार्याला त्याने अग्रक्रम दिला होता. त्या दिशेने पहिले पाऊल 1849 साली त्याने इंग्रज-शीख युद्धात शिखांचा पराभव करून पंजाब ब्रिटिश राज्यास जोडून टाकला, त्यानंतर 1852 मध्ये त्याने आपले लक्ष ब्रह्मदेशाकडे वळविले. त्यापूर्वी ब्रह्मदेशाशी झालेल्या पहिल्या इंग्रज-ब्रह्मदेश युद्धात इंग्रजांना पुरेसे यश मिळाले नव्हते. फ्रेंच आणि इतर युरोपीय सत्तांचा व्यापाराच्या मिषाने ब्रह्मदेशात शिरकाव झाला होता. या परकीय युरोपीय सत्तांपासून ब्रह्मदेशाला मुक्त करून ब्रह्मदेश इंग्रजांच्या कबजात आणणे हे डलहौसीचे मुख्य उद्दिष्ट होते. ब्रह्मदेशाशी झालेल्या एका व्यापारी तहान्वये युरोपातील फ्रेंच, डच इत्यादी व्यापाऱ्यांना ब्रह्मदेशात व्यापार करण्यास सवलती मिळाल्या होत्या. परंतु तेथे व्यापार करणाऱ्या ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या अनेक तक्रारी होत्या, त्यांची । दखल ब्रह्मदेश सरकारने दखल घेतली नव्हती. म्हणून डलहौसीने ब्रिटिश व्यापाऱ्यांना आपल्या तक्रारींची जोरदार मागणी करावयास उत्तेजन दिले. या निमित्ताने डलहौसीने ब्रह्मदेश सरकारशी संघर्ष आरंभला. यातून इंग्रज-ब्रह्मदेश युद्ध 1852 साली उद्‌भवले. ब्रिटिश सेनेने ब्रह्मदेशाचा पराभव करून ब्रह्मदेशास ब्रिटिश वर्चस्वाखाली आणून व्यापारी उद्दिष्टाबरोबर साम्राज्यवादी प्रादेशिक विस्ताराचे उद्दिष्टही साध्य केले.

## संस्थाने खालसा करण्याचे धोरण

ब्रिटिशांच्या साम्राज्यविस्ताराच्या धोरणाचा एक भाग म्हणून हिंदुस्थानातील संस्थाने खालसा करण्याचे धोरण होते. या धोरणाचा प्रवर्तक म्हणून लॉर्ड डलहौसी ओळखला जातो, अर्थात संस्थाने खालसा करण्याच्या धोरणाची मूळ कल्पना डलहौसीची नव्हती. कंपनीच्या संचालक मंडळाने 1834 साली जाहीर केले होते की, एखाद्या संस्थानिकाचा कायदेशीर वारस नसल्यास त्याने दत्तक वारस घेण्यास कंपनीची हरकत नव्हती परंतु दत्तक वारस हा अपवाद समजण्यात यावा, एरवी दत्तक वारस नामंजूर करण्यात येईल व ते संस्थान ब्रिटिश राज्यास जोडण्यात येईल. पुन्हा 1841 साली कंपनीने असेही जाहीर केले की, न्याय्य आणि सन्मान्य कारण असल्याशिवाय संस्थान खालसा करण्यात येऊ नये; तसेच खालसा करण्याचे धोरण सरसकट राबविण्याचे शक्यतो टाळण्यात यावे, असा खुलासाही कंपनीच्या संचालक मंडळाने केला होता. डलहौसीने कंपनीचे हेच धोरण काहीशा आडवळणाने पण ठामपणे लागू करण्यास सुरुवात केली. त्याने कंपनीच्या धोरणाची मूलभूत कल्पना स्पष्ट करताना ब्रिटिश वर्चस्वाखालील सर्व संस्थानिकांना अशी आदेशवजा सूचना केली की, 'हिंदुस्थानातील कंपनीची सत्ता सर्वश्रेष्ठ (Paramount) **असल्याने कंपनीच्या वर्चस्वाखालील संस्थानिकांनी कंपनीच्या परवानगीशिवाय, आपली सत्ता दत्तक पुत्राकडे सोपवू नये. दत्तक पुत्राला मंजुरी देणे वा न देणे हे अधिकार कंपनीकडे आहेत** याची नोंद संबंधित संस्थानिकांनी घ्यावी.' ____ डलहौसीने 'खालसा धोरण' फक्त 'अंकित' (Dependent) संस्थानांनाच लागू करण्याचे ठरविले. मात्र अंकित, स्वतंत्र, सहयोगी (Allied) आणि दुय्यम (Subordinate) संस्थाने याबाबत स्पष्ट असा भेद डलहौसीने कधी केलाच नाही. तसे हेतुःपुरस्सरपणे करण्यात आले होते. डलहौसीला ज्या वेळी एखादे संस्थान खालसा करावयाचे आहे, त्या वेळी तो 'हे संस्थान अंकित आहे' असे सांगत असे, ते 'अंकित' कसे, हे स्पष्ट करण्याची खबरदारी त्याने कधीच घेतली नाही. करौली या एका छोट्या संस्थानास 'अंकित' संस्थान असे जाहीर करून डलहौसीने त्यास ब्रिटिश राज्यास जोडून टाकले. डलहौसीचा हा निर्णय कंपनीने रद्द केला, कारण करौली हे अंकित संस्थान नसून, सहयोगी संस्थान आहे, असे डलहौसीला कळविण्यात आले. या कंपनीच्या निर्णयावर डलहौसीने आपलेही मत व्यक्त केले, तो म्हणतो, एखादे राज्य वा संस्थान वा प्रदेश ब्रिटिश साम्राज्यास जोडावयाचे आहे, त्या-त्या वेळी मिळेल ती संधी वा कारण पुढे करून ते ब्रिटिश साम्राज्यात समाविष्ट केले गेले पाहिजे, हेच राज्यकर्ते म्हणून शहाणपणाचे धोरण आहे. जरी एखाद्या संस्थानिकाने विधीपूर्वक दत्तक पुत्र घेतला असला तरी, **सरकारची मंजुरी घेतली नसेल तर ते संस्थान खालसा करण्यास हरकत नाही**, असेच डलहौसीचे ठाम मत होते व त्यानुसार त्याने या धोरणाची कार्यवाहीदेखील केली होती.

**'दत्तक वारस नामंजूर'** या कारणावरून डलहौसीने अनेक संस्थाने खालसा केली. 1848 साली सातारा संस्थान खालसा केले. कारण साताऱ्याच्या राजास औरस पुत्र नव्हता म्हणून त्याने वारस म्हणून विधीपूर्वक दत्तक पुत्र घेतला. 1848 साली राजा मृत्यू पावला व डलहौसीने साताऱ्याचे संस्थान खालसा केले. कारण मृत्यूपूर्वीच्या दत्तकविधानास ब्रिटिश सरकारची मंजुरी घेतली नव्हती. अशाच प्रकारे दत्तक विधानास मंजुरी न घेतल्याच्या कारणावरून **1849 साली जैतपूर व संबळपूर, 1850 साली बागहत, 1852 साली उदयपूर, 1853 साली झाशी आणि 1854 साली नागपूर** ही संस्थाने डलहौसीने खालसा केली आणि ब्रिटिश राज्यास जोडून टाकली.

# भारताचा भूगोल

infinity®
Engineering Academy

# 1.भारताचे स्थान विस्तार

- स्थान: भारत उत्त्र गोलार्धात आशिया खंडाच्या दक्षिणेस तसेच पूर्व गोलार्धाच्या मध्यभागी आहे.
- **भारताचा अक्षयवृत्तीय विस्तार** – $8^{0}4$ ते $37^{0}$ 6′ उत्तर आहे
- **भारताचा रेखावृत्तीय विस्तार** – $68^{0}7$ पूर्व ते $97^{0}$ 25′ पूर्व
- सौदी अरेबिया, इंडोचायला व भारत हे तीन अशियातील महत्वाचे द्वीकल्प आहेत. यातील भारत हे मोठै द्वीकल्प आहेत. यातील भारत हे मोठे द्वीयकल्प होय. भारतीय द्वीपकल्पाचा आकार सर्वसाधरणपणे त्रिकोणाकृती असून उत्तरेला पाया तर दक्षिणेला त्रिकोणाचे निमुळते टोक आहे.


**भारताचे क्षेत्रफळ**

- भारताचे एकूण क्षेत्रफळ 32,87,263 चौ.कि.मी. आहे.जगाच्या एकूण 2.46 क्षेत्रफळ भारताचे व्यापले आहे व पृथ्वीच्या 0.57 टक्के आहे. भारताचा क्षेत्रफळानुसार सातवा क्रमाक लागतो

**भारतीय प्रमाणवेळ**

- भारताची प्रमाणवेळ ($82^{0}30'$) पूर्व रेषावृत्तावरून निश्चित करण्यात आली आहे, अलाहाबादची जी स्थानिक वेळ आहे. तिच भारतीय प्रमाणवेळ आहे, भारताची प्रमाणवेळ ग्रीनचपेक्षा साडेपाच तासांनी ( 5:30) पुढे आहे.
- पूर्व रेखावृत्तवार असणारे गुजरात व $82^{0}30'$ पूर्व भारतीय प्रमाणवेळ असणारे अलाहबाद यांच्यात सुमारे 58 मिनिटांचा फरक आहे.
- पूर्व रेखावृत्तावर असणारे अरूणाचल प्रदेश भारतीय प्रमाणवेळ असणारे अलाहाबाद यांच्यात 60 मिनिटांचा फरक आहे.

## भारताचे प्राकृतिक विभाग



# हिमालय पर्वत

## हिमालयाची उत्पती

हिमालय पर्वताची निर्मिती ही प्रिकॅब्रियन ते इओसिन कालखंडादरम्यान झालेली आहे.

हिमालय पर्वताच्या उत्पत्तीसंदर्भात सिध्दांत:.–

1) भू – सन्नती किंवा भू- अभिनिती उत्पत्ती सिंध्दांत ( Geosynclines origin theory)

2) भूपट्ट विवर्तनिकी उत्पती सिध्दांत (plate tectnonics origin theory)

## हिमालय:

- **उत्तर–दक्षिण समांतर रांगा**

- ग्रेटर हिमालय/बृहद हिमालय
- लेसर हिमालय/ मध्य हिमालय
- शिवालिक रांगा/ बाह्य हिमालय
- ट्रान्स हिमालय
- पूर्वचिल हिमालय

**पश्चिम ते पूर्व (प्रादिशिक विभाग)**

- पंजाब हिमालय
- कुमॉऊ हिमालय
- नेपाळ हिमालय
- आसाम हिमालय

बृहत पर्वत रांगेतील प्रमुख शिखरे :

| नाव | उंची | ठिकाण | |
|---|---|---|---|
| 1 | मांऊट एव्हरेस्ट | 8850 मी. | नेपाळ |
| 2 | कांचनजुंगा | 8598 मी. | भारत |
| 3 | मकालू | 8481 मी. | नेपाळ |
| 4 | धौलगिरी | 8167 मी. | नपाळ |
| 5 | नंगा पर्वत | 8126 मी. | भारत |
| 6 | अन्नपूर्णा | 8097 मी. | नेपाळ |
| 7 | नंदादेवी | 7817 मी. | भारत |
| 8 | नामचा बरवा | 7758 मी. | तिबेट |

## डून प्रदेश :

- लेसर हिमालया व शिवालीक रांगा यांच्या दरम्यान सखल तळ असणारी कमी रंदीचा भाग यास 'डून' असे म्हणतात.
- उदा. डेहराडून, पाटलीडून, कोटलीडून

**हिमालयातील प्रमुख खिंडी**

| राज्य | खिंड | | जोडणारा प्रदेश |
|---|---|---|---|
| जम्मू आणि काश्मीर | 1 | बानिहाल | श्रीनगर ते जम्मू (जवाहर बोगदा) |
| | 2 | खिंड | लडाख ते चीन |
| | 3 | आघिल खिंड | लडाख ते तिबेट |
| | 4 | | लडाख ते सिक्यॅंग (चीन) |
| | 5 | चांग-ला | लडाख ते तिबेट |

# महाराष्ट्राचा भूगोल

infinity® Engineering Academy

## **1.** महाराष्ट्राचे स्थान




- भारतात एकूण 29 घटकराज्यापैकी महाराष्ट्र हे प्रमुख राज्य आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना 1 मे 1960 रोजी झाली.
- महाराष्ट्राचा भौगोलिक विस्तार $15^0$8' 46" उत्तर ते $22^0$ 02' 13" उत्तर अक्षवृत्तापर्यंत आहे, तर रेखावृत्तीय विस्तार $72^0$ 6' 45" पूर्व ते $80^0$ 9' 17" पूर्व पर्यंत आहे.
- भारताचा फार मोठा व्यापार मुंबईतून चालतो. तो जवळजवळ भारताच्या 21% पर्यंत आहे. महाराष्ट्राने देशास टाटा, बिर्ला, किर्लोस्कर, गोदरेज उद्योग समूह मिळवून दिलेले आहे.
- साखर उद्योगात महाराष्ट्र अग्रेसर आहे. देशातील एकूण साखर कारखान्यापैकी 33% कारखाने महाराष्ट्रात असून देशातील 37 % साखर उत्पादन महाराष्ट्रात होते.
- शेतीवर आधारित उद्योगधंद्यांमध्ये कापड व साखर उद्योगांनी महाराष्ट्राला आर्थिक समृद्धी मिळवून दिली आहे. भारतातील प्रथम कापड गिरणी (1854) मुंबईमध्ये, भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना (1950) प्रवरानगर (अहमदनगर) येथे स्थापन झालेला आहे. भारतातील पहिला लोहमार्ग मुंबई-ठाणे दरम्यान 1853 मध्ये सुरू झाला.
- भारतातील एकूण रेल्वे लांबीच्या 6103 किमी (9.2 %) लोहमार्ग महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्रातील सर्वात लांब रेल्वे बोगदा (6.5 किमी) कोकण रेल्वे मार्गावर कुरबुडे येथे आहे.
- महाराष्ट्रातील सर्वात उंच रेल्वे पुल (64 मीटर) कोकणात पानवळ नदीवर आहे.

## विस्तार

- महाराष्ट्राची पूर्व - पश्चिम लांबी सुमारे 800 किमी आहे; तर दक्षिण- उत्तर लांबी 700 किमी इतकी आहे.
- भारतीय द्विपकल्पाच्या पश्चिम किनाऱ्यावर हे राज्य असून त्याचे क्षेत्रफळ 3,07, 713. चौ.किमी आहे व ते भारताच्या क्षेत्रफळाच्या 9.36 % इतके आहे. त्यानुसार महाराष्ट्राचा भारतात राजस्थान, मध्यप्रदेश नंतर तिसरा क्रमांक लागतो.
- महाराष्ट्राला 720 किमी लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. महाराष्ट्रात कमी अधिक विस्ताराचे 36 जिल्हे असून त्यापैकी अहमदनगर जिल्हा क्षेत्रफळाने सर्वात मोठा आहे; तर मुंबई शहर जिल्हा सर्वात लहान आहे.
- जिल्हा प्रशासनाकरिता लहान भाग तालुक्यांच्या स्वरुपात असतात. महाराष्ट्रात एकूण 358 तालुके आहेत. आपल्या राज्यात 2011 च्या जनगणनेनुसार 11,23,72,972 इतकी लोकसंख्या आहे. ही लोकसंख्या सुमारे 43,665 गावात व 534 शहरात वितरित झालेली आहे. प्रशासनाच्या सोयीसाठी 36 जिल्ह्याचे कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपुर असे सहा प्रशासकीय विभाग केलेले आहेत.
- सन 2011 च्या जनगणनेनुसार 11.23 कोटींच्या वर लोकसंख्या असून महाराष्ट्राचा उत्तर प्रदेश खालोखाल दुसरा क्रमांक लागतो. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या 9.29 % लोकसंख्या महाराष्ट्रात राहते.

**किनारपट्टीची जिल्ह्यानुसार लांबी**

1. रत्नागिरी -237 किमी.
2. रायगड - 122 किमी.
3. सिंधूदुर्ग -120 किमी.
4. मुंबई (शहर व उपनगर) - 114 किमी.
5. पालघर - 102 किमी.
6. ठाणे -25 किमी.

## महाराष्ट्राच्या राजकीय सिमा

| क्र. | दिशा | राजकीय सिमा | सिमावर्ती जिल्हे | सिमावर्ती प्रशासकीय विभाग |
|---|---|---|---|---|
| 1. | वायव्य | 1. दा.न.ह | पालघर | कोकण |
| | | 2. गुजरात | पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार | कोकण, नाशिक |
| 2. | उत्तर | 1. मध्यप्रदेश | नंदुरबार, धुळे, जळगांव, बुलढाणा अमरावती, नागपुर, भंडारा, गोंदिया | नाशिक, अमरावती, नागपुर |
| 3. | पूर्व | छत्तीसगड | गोंदिया, गडचिरोली | नागपुर |
| 4. | आग्नेय | तेलंगना | गडचिरोली, चंद्रपुर, यवतमाळ, नांदेड | नागपुर, अमरावती, औरंगाबाद |
| 5. | दक्षिण | कर्नाटक | नांदेड, लातुर, उस्मानाबाद, सोलापुर, सांगली, कोल्हापुर, सिंधुदुर्ग | औरंगाबाद, पुणे, कोकण |
| | | गोवा | सिंधुदर्ग | कोकण |

## प्रादेशिक नावे

**1. कोकण :** सह्याद्रीच्या पश्चिमेकडील सखल प्रदेशाला कोकण म्हणतात तर सह्याद्रीच्या पश्चिम पायथ्यालगतच्या भागाला 'तळकोकण' म्हणतात.

**2) मावळ :** सह्याद्रीच्या माथ्यावरील तसेच त्याला लागून पूर्वेकडे असलेल्या भागाला मावळ म्हणतात.

**3) देश :** सह्याद्रीच्या पूर्वेकडील महाराष्ट्र पठाराचा पश्चिमभाग म्हणजे देश होय.

**4) खानदेश:** धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्ह्यांना खानदेश म्हणतात. हा प्रदेश तापी नदी खोऱ्याने व्यापलेला आहे.

**5) मराठवाडा :** औरंगाबाद प्रशासकीय विभागाला मराठवाडा म्हणतात. हा प्रदेश गोदावरी नदी खोऱ्याने व्यापलेला आहे.

**6) विदर्भ :** अमरावती व नागपूर विभागांना विदर्भ म्हणतात. हा प्रदेश वर्धा व वैनगंगा नदी खोऱ्याने व्यापलेला आहे. त्यातही पूर्व भागाला झाडी आणि मध्य व पश्चिम विदर्भाला वहाड असे म्हणतात.

# No.1 INSTITUTE for MPSC CIVIL ENGINEERING
## HIGHEST NO. OF SELECTIONS ALL OVER MAHARASHTRA

infinity® Academy




- स्पर्धा परीक्षेमधील 7 वर्षांहून अधिक अग्रगण्य नाव
- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES) स्थापत्य /विद्युत /यांत्रिकी साठी पूर्व + मुख्य + मुलाखत या तिन्ही टप्प्याची तयारी करवून घेणारी महाराष्ट्रातील नं 1 अकॅडमी
- 3500+ अधिकारी घडविणारी संस्था
- OFFLINE व ONLINE माध्यमातून मार्गदर्शन



महाराष्ट्र शासनामधील विविध विभागातील होणाऱ्या सरळसेवा भरती परीक्षाची तयारी करून घेणारी संस्था. कनिष्ठ अभियंता /अभियांत्रिकी सहाय्यक / नगर रचनाकार सहाय्यक या परीक्षेसाठी (टेक्निकल +नॉन टेक्निकल ) विषय तज्ञ् अनुभवी मार्गदशकांकडून शिकवले जातात.



सर्व स्पर्धा परीक्षेची तयारी करवून घेण्यासाठी इन्फिनिटी अकॅडमी मध्ये तज्ञ् शिक्षक वर्ग आहेत.

विविध विषयासाठी (टेक्निकल +नॉन टेक्निकल)DEDICATED अनुभवी शिक्षक वर्ग असल्यामुळे स्पर्धा परीक्षेतील प्रत्येक विषयाला योग्य न्याय दिला जातो व तो विषय उत्तमप्रकारे शिकवले जातो.

विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षेमार्फत शासनात निवड हे एकमेव ध्येय इन्फिनिटीच्या अनुभवी शिक्षकांचे आहे

# No.1 INSTITUTE for MPSC CIVIL ENGINEERING

HIGHEST NO. OF SELECTIONS ALL OVER MAHARASHTRA

infinity® Academy

No.1 ENGINEERING INSTITUTE



**AEE (CIVIL) 2023**

**RUSHIKESH RAOSAHEB DHAMNE**

Proud To Be No.1 Institute In Maharashtra



MES RANK 1 MECHANICAL

**PRATIK AGAWANE**



MES RANK 1 ELECTRICAL

**SANKET SHINDE**



**HARSHAL SANJAY KHAIRNAR**

सहाय्यक नगर रचनाकार (ATP)



**KALYANI BHADANE**

सहाय्यक नगर रचनाकार (ATP)

## RANK 1st IN MAHARASHTRA

infinity®
Engineering Academy



New Batches

# MPSC MES (CE | ME | EE)

## FOUNDATION BATCH

PRE + MAINS + INTERVIEW

## CIVIL ALL DIRECT RECRUITMENT

PWD | WRD | WCD | MIDC | ZP | NAGARPARISHAD

ELECTRICAL

MAHATRANSCO BATCH

MAHAGENCO BATCH

MECHANICAL

ARTO BATCH

RTO AMVI BATCH

# MPSC ATP

## FOUNDATION BATCH

ONLINE + OFFLINE

All Batches Available

TEST SERIES FOR ALL COMPETITIVE EXAMS

PUNE | Infinity Academy, First Floor, Mankar Wada, Near Modi Ganpati,Narayan Peth, Pune.

Join us on telegram @infinitympsccivil

9699897070
788 781 1411